Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१० /२०२६

**विषय – गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरील (कॅन्सर) लसीकरणाबाबत.**

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थीनी व हंगामी रोजंदारी/एकत्रित मानधनावरील मुली व महिला यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठातील आरोग्य केंद्रामार्फत विद्यापीठातील विद्यार्थीनी, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या वय वर्ष ९ ते १४ व त्यावरील वयोगटातील मुलींना तसेच हंगामी रोजंदारी/एकत्रित मानधनावरील मुलींना भविष्यातील कॅन्सरचा धोका टाळण्यासाठी HPV (Human Papillomavirus Vaccine) या गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरील प्रतिबंधात्मक लसीकरणाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

सदर लसीकरणाचे डोस हे छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालय, कोल्हापूर (सी.पी.आर.) व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांचेकडून पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहेत.

तेंव्हा, विद्यापीठातील सर्व विद्यार्थीनी, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या उपरोक्त नमुद वयोगटातील मुलींनी व हंगामी रोजंदारी/एकत्रित मानधनावरील मुली व महिला यांनी सदर कॅन्सरवरील लस घेण्यासाठी दि. २८ जानेवारी, २०२६ ते दि.२९ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत आरोग्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे उपस्थित रहावे.

कुलसचिव

जावक क्रमांक. आस्थापना/१३७

दिनांक : 27 JAN 2026

**प्रति,**

१. मा. कुलगुरू, प्र.कुलगुरू, कुलसचिव, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.
२. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक.
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहायक कुलसचिव व समकक्ष अधिकारी. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
४. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र
५. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थीनी व हंगामी रोजंदारी/एकत्रित मानधनावरील महिला सेवक यांच्या निदर्शनास आणावे.